


# गंमत जम्मत

IGNUS
KNOWLEDGE EMPOWERS

SAVE The Children India

educo
Member of ChildFund Alliance

## गंमत जम्मत पुस्तिका बद्दल

- **"गंमत जम्मत" पुस्तिका का बनवली आहे?**

चालू शैक्षणिक वर्षात (२०२० -२१) शाळा नेहमी सारख्या सुरु झाल्या नाहीत, कारण सध्याच्या कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव सर्वदूर पसरला आहे. सर्वांची सुरक्षा पाहता शाळा जरी बंद असल्या तरी शिक्षण सुरु आहे. विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी जी काही साधने आहेत, जसे कि वॉट्स अँप, आणि एसएमएसचा उपयोग केला जात आहे. "गंमत जम्मत" ही पुस्तिका बनवणे, त्याची छपाई आणि वितरण देखील मुलांपर्यंत पोहोचण्याचा एक प्रयत्न आहे.

- **"गंमत जम्मत" पुस्तिका काय आहे?**

विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतेनुसार त्या इयत्तेतील कौशल्ये आत्मसात करण्यासाठी पूरक साहित्य म्हणून हि "गंमत जम्मत" पुस्तिका आहे. कृती करण्यात मुलांचा सहभाग, आवड आणि मनोरंजन सोबत अध्ययन निष्पत्ती आणि काठीण्यापातळीकडे पण लक्ष देण्याचा प्रयत्न केला आहे.

- **"गंमत जम्मत" पुस्तिका चे स्वरूप कसे आहे?**

– मुलांना हे साहित्य कार्यपत्रिका (वर्कशीट) स्वरुपात दिले आहे.
– पुस्तिकेमध्ये दिलेल्या कृती सोबत दिलेल्या वहीत सोडवायच्या आहेत.
– पुस्तिका दोन स्तरानुसार बनवण्याचा प्रयत्न केला आहे (वर्ग १ ते ३, वर्ग ४ आणि ५).
– घरात व स्थानीय परिसरात सहज उपलब्ध वस्तूंचा उपयोग होईल असे प्रश्न आणि कृती यामध्ये समाविष्ट केल्या आहेत.
– पुस्तिकेतील वर्कशीट्स शाळेच्या नियमित अभ्यासाची उजळणी (अगोदर शिकलेल्या भागाची), काही नवीन शिकणे, सराव आणि दृढीकरणासाठी सहाय्यक ठरू शकतील.

मुलांना या पुस्तिकेचा कसा उपयोग होत आहे हे जाणण्याकरिता पुस्तिकेच्या शेवटी एक सारणी दिली आहे. जसे-जसे मुलं कृती करतील, त्या सारणीत कृती समोर केल्याची खूण करून दिनांक लिहावे. त्याच बरोबर कृती विषयी दिलेले प्रश्नांबद्दल आपले प्रतिसाद लिहून कळवावे अशी विनंती.

मुलांना दिलेल्या कृतीमध्ये काय आणि कसे करायचे हे समजण्यासाठी घरातल्या मोठ्यांची मदत लागू शकेल. याकरीता, पुस्तिकेत काही चिन्ह दिले आहेत:


मुलांनी वहीमध्ये लिखाणकाम करावे


मुलांनी स्वतः वाचून सांगितलेले करावे


मोठ्यां सोबत/ पालकांनी वाचून समजवावे


पालकांनी कृतीत मदत करावी

आशा आहे की मुलं ह्या पुस्तिकामध्ये सुचविलेल्या कृतींचा आनंद घेतील. आम्ही आपल्याकडून याबद्दल ऐकण्यासाठी उत्सुक आहोत. तुम्हाला यातील कोणत्या गोष्टी आवडल्या आणि कुठे बदल किंवा सुधार करण्याची गरज आहे, असे वाटते, ते आम्हाला नक्की कळवा. यासाठी किंवा कृतीबद्दल तुमचे प्रश्न असतील तर आमच्या टीम बरोबर खाली दिलेल्या फोन वर संपर्क साधावे.


| वार | वेळ | संपर्क करावयाच्या व्यक्तीचे नाव | फोननंबर |
|---|---|---|---|
| सोमवार, मंगळवार | सायंकाळी 4 ते 7 | भाविका नेमाडे | 8888893965 |
| बुधवार, गुरुवार | सायंकाळी 4 ते 7 | भारती मेटांगे | 9604797117 |
| शुक्रवार, शनिवार | सायंकाळी 4 ते 7 | सविता ठोंबरे | 9766588023 |

## यात काय आहे?

| क्र. | कृतीचे नाव | वर्णन / माहिती |
|---|---|---|
| १. | वर्गातील वस्तूंची गंमत | (वर्गातील) परीचयाच्या वस्तूंची ओळख आणि त्या कृतीमध्ये जे चित्र दिले आहे ते पाहून कोणत्या वस्तू जवळ आणि कोणत्या वस्तू दूर ते पाहून खुण करणे. |
| २. | माझा घोडा | दैनंदिन व सभोवताली असलेल्या परिसराच्या संदर्भात अंकांचा वापर करून कृती करणे. |
| ३. | चला कृती करूया | चित्रे आणि मुळाक्षरे यांचा आकार व रचानांकडे लक्ष वेधण्यासाठी त्यावर डाळी, रांगोळी, झाडाची पाने, फुले, चिटकवण्याची कृती करणे. |
| ४. | आवाज आणि अक्षर | बोललेल्या भाषेच्या ध्वनींना (उच्चाराला) लिखित चिन्हांशी जोडण्याची कृती करणे. |
| ५. | चला जाऊ आकारांच्या दुनियेत | आजूबाजूच्या परिसरातील वस्तूंचे वेगवेगळे आकार लक्षात घेणे, त्यांची नावे जाणणे, त्या आकारांविषयी अधिक माहिती घेणे, वैशिष्ट्ये समझणे. |
| ६. | अक्षर अंकचित्रे | अक्षर आणि अंकांचे आकार पाहून त्यावर आधारित विविध रेखांकने, चित्रे काढण्याची कृती करणे. |
| ७. | क आणि म ची कविता | बोलतांना / म्हणतांना शब्दांतील अक्षर (चिन्ह) ओळखने, त्या अक्षरांचे आवाज लक्षात घेऊन अजून शब्द सांगणे, लिहिणे/ चित्र काढण्याची कृती करणे |
| ८. | अक्षर, शब्द आणि वाक्य | अक्षरांची ओळख करून त्या अक्षरांपासून शब्द लिहिणे, तसेच त्या शब्दांपासून वाक्य लिहण्याची कृती करणे. |
| ९. | दोनची गंमत | सभोवताली असणाऱ्या वस्तूं द्वारे 1 ते 10 अंक दाखविणे आणि अंकाच्या पटीतील उदाहरणे. सांगण्याची कृती करणे. |
| १०. | शोधू शब्द, काढू चित्रे. | अक्षर/चिन्हांचे आकार व ओळख लक्षात घेऊन वाचन आणि अक्षरानुसार शब्दचित्रे काढण्याची कृती करणे. |
| ११. | किती हे वेगवेगळे आकार | वेगवेगळ्या पानांचे आणि घरातील भांड्यांचे आकार/रचना लक्षात घेवून वर्गीकरण करणे  व यापासून नक्षी बनविणे. |
| १२. | येतात आपल्या कामी | आपल्या दैनंदिन जीवनात वापरत असलेल्या वस्तूंचे महत्व आणि उपयोग जाणून घेणे. |
| १३. | चला हाताळूया नाणी-नोटा | 1 ते 100 रुपयांच्या नाणी नोटांचे ओळख करून घेणे, सुट्टे करणे आणि खर्च केलेल्या पैश्यांची पावती बनविण्यास शिकण्याची कृती करणे. |
| १४. | चला शिकूया ठसेकाम | भेंडी किंवा काड्यांच्या सहाय्याने नक्षीकाम करणे. |
| १५. | चला विचार करून जोडू या | काड्यांचा वापर करून, वेगवेगळ्या पद्धतीने विचार करून, कोडे सोडविणे. |
| १६. | मुलांच्या गप्पा | चित्र पाहून, कोणत्या वस्तू दूर, कोणत्या जास्त महत्वाच्या आणि त्या चित्रात (संदर्भात) अजून कशाचा समावेश करू शकतो याचा अंदाज करणे. |
| १७. | सुंदर सजावट | विविध पाने, फुले, इतर उपलब्ध वस्तूंच्या सहाय्याने वेगवेगळ्या प्रकारची रांगोळी आणि नक्षी साकारण्याची कृती करणे.. |
| १८. | बागेतील मज्जा आणि अचानक... | चित्राच्या आधारे दिलेली गोष्ट/प्रश्न वाचून आपल्या विचारांची भर घालुन कल्पनेने गोष्ट/प्रश्न पूर्ण करणे. |
| १९. | चला शिकूया ठसेकाम | आपल्या हातांच्या ठशांचा वापर करून विविध चित्रे काढणे आणि चित्रे काढण्याच्या दृष्टीने हाताची ठसे कसे उमटवता येतील याचा विचार करणे. |
| २०. | जलतरंग | घरातील लहान भांड्यांचा वापर करून संगीत तयार करण्याची कृती करणे. |
| २१. | अक्षरजोड | मुळाक्षरांचा क्रम जोडत जोडत चित्र तयार करणे. |
| २२. | कोरोना साप शिडी | मुलांना कोरोना विषयी असलेली माहिती आणि त्या विषयी जागरूकता करणे. |

## १. वर्गातील वस्तूंची गंमत

**चित्र निरीक्षण –** खालील चित्राचे निरीक्षण करा.




(१) चित्रातील कोणत्या वस्तू तुमच्या वर्गातपण आहेत? त्या वस्तूंच्या चित्राला गोल करा.

(२) चित्रात अजून काय असू शकते? ते ह्या चित्रात जोडा.

(३) चित्रातील कोणत्या वस्तू तुम्हाला तुमच्या वर्गात असायला आवडतील? का?

(४) खुर्चीपेक्षा मोठ्या वस्तूला "**√** "अशी खुण करा**.**

(५) खुर्चीपेक्षा छोट्या वस्तूला "**X**" अशी खुण करा.

(६) खुर्चीपासून जे सगळ्यात लांब आहे त्यासमोर "**#** " काढा

(७) खुर्चीपासून जे सगळ्यात जवळ आहे त्यासमोर "*****" काढा.

## २. माझा घोडा

**एक, दोन, तीन, चार**

**घोडा चाले पटकन फार**

**पाच, सहा, सात, आठ**

**बघा याचा थाटमाट**

**आता झाले बघा नऊ**

**पण म्हणतो दूर फिरून येऊ.**





(१) घोडा किती दूर गेला असेल?

(२) तुमच्या घरात तुम्ही 9 पाऊले चला. किती अंतर पार झाले? हे अंतर घोड्याने पार केलेल्या अंतरा पेक्षा कमी असेल कि जास्त? का?

(३) तुम्ही तुमच्या घरात 1 ते 9 अंक म्हणत चालायचे आहे. जेवढे अंक तेवढ्या टाळ्या वाजवा. याप्रमाणे; पहिले पाऊल घेतल्यावर एक टाळी वाजवा. दुसरे पाऊल घेतल्यावर दोन टाळ्या वाजवा.

(४) आपल्या घराच्या दारापासून दूर कोणती पण वस्तू निवडा. त्या वस्तू जवळ जाऊन उभे राहा. आता आपली पाऊले मोजत दारापर्यंत चालत जा. त्या वस्तूपासून दारापर्यंत जायला किती वेळा 1 ते 9 अंक मोजावे लागले?

(५) वरील प्रमाणे अजून 4 वस्तूंचे दारापासुनचे अंतर पावलाने मोजा.

(६) तुम्ही मोजल्या प्रमाणे कोणती वस्तू दारापासून सगळ्यात जवळ आहे? कोणती वस्तू दारापासुन सगळ्यात दूर आहे?

(७) काही वस्तू दारापासून जवळ आणि काही वस्तू दारापासून दूर ठेवलेल्या आहेत, असे का?

## ३. चला कृती करूया

- मोठ्यांच्या मदतीने वेगवेगळी चित्रे, आकार व मुळाक्षरे निवडा.
- ते बघून आपल्या वहीत काढा.
- त्यावर चिकटवण्यासाठी झाडांची पाने, फुले, माती, रेती, वाळू, रांगोळी, धान्य (गहू, ज्वारी, बाजरी, कडधान्य), डाळी यापैकी एक वस्तू आणि डिंक लागेल.


**सुरुवात करण्यासाठी**

(१) खाली 'अ' अक्षरावर डाळ चिकटवली आहे.

(२) आता तुम्ही 'म' आणि 'घ' अक्षरावर पण असेच काही चिकटवा.










## ४. आवाज आणि अक्षर

**या कृतीत चित्रांची नावे सांगायची आहे.  शब्द म्हणतांना / उच्चार करताना येणाऱ्या पहिल्या आवाजाची (व अक्षरांची) ओळख करून द्यायची आहे.**

– सुरुवातीला मुलांना जी भाषा सोयीची वाटेल त्या भाषेत चित्रांची नावे सांगू द्यावीत.
– जर मांजराचे चित्र बघून 'कॅट' किंवा 'बिल्ली' म्हणाले तर 'म' ला गोल करता येणार नाही, कारण ते शब्द 'क' आणि 'ब' या आवाजापासून (अक्षरापासून) सुरु होतात. अशा वेळेस 'कॅट' किंवा 'बिल्ली' ला मराठीत मांजर म्हणतात असे सांगू शकतो.
– मांजरला म्याऊ / मनी असे म्हणाले तर 'म' ला गोल करता येईल, कारण ते शब्द 'म' या आवाजापासून (अक्षरापासून) सुरु होतात.
– भाग  - २ शक्य तितका मुलांना स्वतःच करू द्या.



**भाग – १ खाली दिलेल्या चित्रांची नावे एक - एक करून तोंडी सांगा.** शब्द्चित्राचे नाव 'म' या आवाजापासून (अक्षरापासून) सुरु होत असेल तर त्या चित्राला गोल करा.  बघा: मांजराच्या चित्राला गोल केले आहे. मांजर हा शब्द 'म' च्या आवाजाने/अक्षराने सुरु होतो.




**भाग-२:** वरील चित्रात 'क' आवाजापासून (अक्षरापासून) सुरु होणारे शब्दचित्रांना गोल करून 'क' अक्षर लिहा. *बघा* :– 'क' या अक्षरापासून सुरु होणारे शब्दचित्र 'कप' ला तुटक रेषेत गोल करून दाखवले आहे.

## ५. चला जाऊया आकारांच्या दुनियेत

१. खाली दिलेली चित्रे बघा. त्यांचे आकार बघा. यासारखे आकार घरात व आजूबाजूला कुठे कुठे दिसतात? त्या वस्तूंची नावे लिहा किंवा चित्रे काढा.

| चपाती | ब्रेड | सामोसा | मोबाईल फोन |
|---|---|---|---|
|  |  |  |  |
| पापड  फुटबॉल  | | | |

२. इथे मोबाईल फोनची दोन चित्र आहेत? दोन्ही चित्रात काय फरक दिसतो?













३.   आता हे ब्रेडचे चित्रं बघा. ब्रेडच्या आकारातील भाग रेषा कडून, नावे लिहून दाखवली आहेत.  चित्रात दाखवलेल्या दोन आकारात काय फरक दिसत आहे ?





४.  तुम्ही प्रश्न १ मध्ये लिहिलेल्या किंवा चित्र काढलेल्या वस्तूंचे खालील प्रमाणे वर्गीकरण करा.

| आकार | वस्तू | आकार | वस्तू |
|---|---|---|---|
|  वर्तुळ |  पापड |  गोल |  फुटबॉल |
|  | |  | |
|  | |  | |
|  | |  | |

| | | | |
|---|---|---|---|
|  | |  | |
| अजून कोणते आकार आहेत आजूबाजूला? | | | |

५. तक्त्यात आपण वस्तूंचे नाव, आकाराचे चित्र, कडा व कोपरे किती ते लिहूया.

| वस्तूचे नाव | वस्तूचा आकार | कडा | कोपरे |
|---|---|---|---|
| खोके |  | 12 | 8 |
| | | | |
| | | | |
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

६. विचार आणि चर्चा करा:

घरातील वेगवेगळ्या आकाराच्या वस्तूंचे जर माप घ्यायचे झाले तर त्यासाठी कोण कोणती साधने लागतील?



*उदाहरण* - टी.व्ही.चे माप घेण्यासाठी मोजपट्टी लागेल

.....................................................................................................................................


.....................................................................................................................................

.....................................................................................................................................

.............................................................................

## ६ अक्षर अंक चित्रे

**अक्षर आणि अंकापासून चित्र बनवता येतात! *कशी*? हे बघा.**






**अशीच चित्र मराठी, इंग्रजी व कोणत्याही भाषेच्या अक्षर व अंकांपासून बनवता येतात.**

(१) इथे दाखवलेल्या अक्षरांपासून व अंकांपासून अजून वेगवेगळे आकार बनवता येतील का? ते तुमच्या वहीत काढा.

(२) तुम्हाला माहित असलेले अक्षर, अंक वापरून जास्तीत जास्त चित्र काढा.

(३) तुमच्या नावामध्ये येणाऱ्या मराठी व इंग्रजी अक्षरांपासून कोणती चित्रे काढू शकता ? आपल्या वहीत काढा.

(४) तुमची जन्मतारीख व वर्षापासून कोणकोणती चित्रे काढता येतील? ती वहीत काढा.

## ७. क आणि म ची कविता



**वाचन करतांना मुलांना मदत लागू शकेल. वाचन करताना मुलांना असे करायला सांगु शकता.**

- पहिले वाचन : 'क' आणि 'म' आले कि टाळी वाजवायची.
- दुसरे वाचन : 'क' आणि 'म' अक्षराच्या भोवती गोल करायचा.
- तिसरे वाचन : कवितेत 'क' आणि 'म' शिवाय सुरु होणाऱ्या शब्दांच्या खाली रेष काढायची आहे.



**माकडा माकडा**

**कान कर वाकडा**

**माकड गेले घरात**

**तेल गेले कानात**

**चक चक चकली**

**तेलाने माखली**

**तुकडा तोडताच**


**कुरकुर लागली!**

(१) कविता म्हणतांना / वाचताना तुम्ही काही शब्दांच्या खाली रेष काढली असेल. त्या शब्दांचे पहिले अक्षर काय आहे? इथे लिहा

............................................................................................................

............................................................................................................

(२) आता तुम्ही वर लिहिलेले अक्षर पुढे दिलेल्या तक्त्यात शोधून त्याच्या पुढे लिहा.
तुमच्या मदतीसाठी उपयुक्त शब्दचित्र दिले आहे.
*तक्त्यात बघा* लिंबूच्या चित्रासमोर 'ल' लिहिला आहे.

| | |
|---|---|
| **च** |  |
| **ल** |  |
| **घ** |  |
| **र** |  |
| | |
| | |

(३) आता तक्त्यात लिहिलेले अक्षर त्या रकान्यात 5 वेळा उच्चार करीत लिहा.

(४) वर रकान्यात लिहिलेल्या अक्षरापासून अजून कोणकोणते शब्द सुचतात? त्याचे चित्र तुमच्या वहीत काढा आणि त्या शब्द्चित्राचे पहिले अक्षर लिहा.

## ८. अक्षर, शब्द आणि वाक्य

(१) तुमच्या घरात 'क' आणि 'म' या अक्षरांपासून सुरु होणाऱ्या वस्तूंची यादी बनवा. (चित्र काढा किंवा नावे लिहा)



| क | म |
|---|---|
| कप | माठ |
| कात्री | |
| | |

(२)खाली दिलेले शब्द पुढे दिलेल्या सारणीतल्या कोणत्या रकान्यात लिहिणार?

लिंबू, लेझीम, कबड्डी, पेरू, कोल्हा, गुलाब, जांभूळ, वाघ, काकडी, वड, मोर, टिपरी, पान, सूर्य, निशा, दिनू, मोटार, सायकल, पतंग, झेंडू, पकडापकडी, पोपट, ससा, हिराबाई, केळी, डबा, वासरू, खीर, बाग, लेझीम, बादली, लाडू, गुळ, ..
................................*यात तुमच्या वरील यादीतील शब्दसुद्धा लिहा......*

| अक्षर | प्राणी/ पक्षी | वस्तू | फुल | खेळ | फळे | व्यक्तींची नावे |
|---|---|---|---|---|---|---|
| ल | | | | | | |
| क | | | | | | |
| प | पोपट | पिशवी | पारिजातक | पकडापकडी | पेरू | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| म | | | | | | |

(३) वरील तक्त्यातील कोणत्याही ४–५ ओळी निवडा.
निवडलेल्या प्रत्येक ओळीतील २-३ शब्द वापरून वाक्य तयार करा आणि वहीत लिहा.
*उदाहरण:* मी पिशवीमध्ये पारिजातकाची फुले गोळा केली

## ९. दोनची गंमत

राजू आणि निशा मधे चढा ओढ लागली होती कि कोण सर्वात जास्त ‘**दोन’** च्या प्रमाणात असलेल्या गोष्टी शोधून दाखवतो.





राजू म्हणतो, “आपल्याला डोळे २.”

निशा म्हणते, “बघ, कान देखील २.”






राजू म्हणतो, “हात २.”

निशा म्हणते, “बैलाला शिंगे २.”

राजू म्हणतो, “पाय २.”



त्यांची चढाओढ बघून त्यांची आई म्हणाली, “आता तुम्ही **दोन**च्या गुणाकाराने येणारी संख्या कुठे कुठे दिसते ते सांगा.”




अS अS अS... आता राजू आणि निशा विचार करू लागले.

निशाने विचारले, “आई २ आणि २ मिळून ४ होतात, तसे का ग?”

आई, ‘हो’ म्हणाली.

निशाने चटकन सांगितले, “टेबलाला पाय ४.”



राजू म्हणाला, “षटकोनाला बाजू ६”.

“शाब्बास! निशा, राजू, आता पुढे करा”, आई म्हणाली. आता पाळी निशाची होती.  निशा म्हणाली, “मग अष्टकोनाला बाजू ८.”



राजू म्हणाला, “जे मी सांगितले तेच तू नाही सांगायचे.”

“बंर पुढच्या वेळी लक्षात ठेवीन. या पंख्याला पाते आठ”, निशा म्हणाली.



राजू म्हणाला, “रावणाची तोंडे १०.

आपल्याला जमायला लागल. वाSSS!

अशा पद्धतीने राजू आणि निशाचा खेळ सुरूचआहे.

(१) जर तुम्ही राजू निशाच्या जागी असता तर वरील गोष्टीमध्ये तुम्ही कोणती उदाहरणे दिली असती?

(२) षटकोनाचा आकार ६ रेषां जोडून बनतो. असे ६ रेषा वापरून अजून कोणते आकार बनवू शकता? काढून बघा.

(३) राजू आणि निशाची हि गोष्ट पुढे गेली तर त्यामध्ये पुढे कोणत्या संख्या व वस्तू असू शकतील? ते लिहून काढा.

(४) दोन हि संख्या किती वेळा घेतली म्हणजे आपल्याला ३ अंकी संख्या मिळेल?

(५) वरील प्रमाणे तीनच्या (३) संख्या असलेल्या वस्तू शोधा आणि त्यांची नावे लिहा.

(६) तुम्ही देखील चार (४) व पाच (५) या अंकापासून असे काही खेळ बनवा व ते कसे खेळायचे लिहून काढा.

# १०. शोधू शब्द काढू चित्रे

ठिपके जोडा आणि चित्रे पूर्ण करा. चित्रात रंग भरा.



(१) तुम्ही पाहिलेली बाग आठवा. या चित्रातल्या बागेत पण बघा. ‘ब’, ‘घ’, ‘आ’ अक्षरांवरून सुरू होणारे नावाचे काय काय दिसत आहे? त्यांची नावे लिहा आणि / किंवा चित्रे काढा. एक उदाहरण खाली दिलेले आहे.

| ब | घ | आ |
|---|---|---|
|  **ब-बदक** |  **घ-घर** |  **आ-आई** |
| | | |
| | | |
| | | |

(२) तुम्ही वर काढलेली सर्व चित्रे मिळुन एक मोठे चित्र वहीत काढा.

## ११. किती हे वेगवेगळे आकार!

या कृती साठी;

- आपल्या घरा जवळ कुंडी मध्ये किंवा अंगणात झाडे असतील तर त्यांची पाने गोळा करा. झाडाची पडलेली, वाळलेली पाने पण चालतील.
- तुम्ही जमा केलेल्या पानांचे नीट निरीक्षण करा.
- पाने फुले नाही मिळाली तर चित्रात दिलेल्या पानांसोबत पुढील कृती करा.



(१) किती प्रकारची पाने आहेत?

(२) कोणकोणते वेगळे आकार आहेत? (लांब, गोल, लहान, मोठे, जाड, बारीक)

(३) लांब पाने किती आहेत?

(४) गोल पाने किती आहेत?

(५) पानांना त्यांच्या लांबी प्रमाणे क्रमाने लावा. तुम्ही बनवलेल्या क्रमाचे चित्र काढा.

(६) पाने कोणत्या झाडांची आहे लिहा. माहिती नसेल तर घरातील मोठ्यांना विचारा.


(७) सांगितलेल्या क्रमात लावल्यावर सर्वात मधे कोणत्या झाडाचे पान आले आहे?

(८) मधल्या पानापेक्षा किती पाने लहान आहेत? ती पाने कोणकोणत्या झाडांची आहेत?

(९) मधल्या पानापेक्षा किती पाने मोठी आहेत? ती पाने कोणकोणत्या झाडांची आहेत?

(१०) तुम्ही गोळा केलेले किंवा वरील चित्रातील पानांचे २ ते ३ वर्ग पाडायचे असतील तर ते कसे कराल? पानांच्या कोणत्या गुणांच्या आधारावर वर्गीकरण कराल?

**पानांपासून खाली दिल्या प्रमाणे वेगवेगळी चित्र / नक्षी बनवा**. तुमच्या वहीत चिकटवा. शक्य असल्यास तुम्ही जे बनविले आहे त्याचा एक फोटो आम्हाला पाठवा



**दुसरीपद्धत:**

स्वयंपाक घरातील वेगवेगळ्या आकारांची भांडी मोठ्यांना विचारून गोळा करा.

(१) भांड्यांना सगळ्यात लहान ते मोठे, या क्रमाने लावा.

(२) तुम्ही बनवलेल्या क्रमाचे चित्र काढा. भांड्यांची नावे लिहा.

(३) सर्वात मधे कोणते भांडे आहे?

(४) मधल्या भांड्या पेक्षा किती भांडी लहान आहेत? मोजा.

(५) मधल्या भांड्यापेक्षा किती भांडी मोठी आहेत? मोजा.


(६) तुम्ही गोळा केलेल्या भांड्यांचे 2 ते 3 वर्ग पाडायचे असतील तर ते कसे कराल? भांड्यांच्या कोणत्या गुणांच्या आधारावर वर्गीकरण कराल?






# १२. येतात आपल्या कामी

**आहेत इथे वस्तू कमी**
**येतात आपल्या ह्या खूप कामी**
**खुर्ची बाई, ऐटीत बसते**
**तिच्या हाताचा आधार देते.**
**टेबल महाशय,**
**जागेवरून कमीच हलतो**
**त्यावर मात्र आपण काम करतो**
**आपल्याला जेव्हा घाम येतो**
**तेव्हा आपला पंखा फिरतो**





(१) घरामध्ये तुम्हाला कोणत्या वस्तुंचा खुप उपयोग होतो? अश्या 5 वस्तूंविषयी लिहा. जसे: पेन्सील: आपण लिहिण्यासाठी तिचा उपयोग करतो

(२) घरातील अशी वस्तुं सांगा जी तुम्ही सगळ्यात जास्त वापरता. ती वस्तु कशासाठी वापरतात? ती वस्तू नसली तर काय होईल? आणि मग तुम्ही कसे /काय कराल?

(३) वरील प्रश्न घरातील इतर लोकांनापण विचारा, माहिती मिळवा. अशी सारणी तुमच्या वहीत बनवा आणि त्यात ही माहिती लिहा.

| व्यक्ती | वस्तुचे नाव | वस्तुचे उपयोग | वस्तू नसली तर | असे करता येईल |
|---|---|---|---|---|
| मी | | | | |
| आई | | | | |
| बाबा | | | | |
| आजी | | | | |
| आजोबा | | | | |
| दादा | | | | |
| ताई | | | | |

## १३. चला हाताळूया नाणी - नोटा

(१) 1 ते 100 पर्यंत कोणकोणती नाणी आणि नोटा असतात? माहीत करा व लिहा.



|  नाणी |   नोटा |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

(२) नाणी-नोटांवर कोणती चित्रं असतात? काय लिहलेले असते? लिहा किंवा चित्र काढून सांगा.

(३) तुमच्या मित्राला सुट्टे पैसे हवे आहेत. वरील सगळी नाणी आणि नोटा तुमच्याकडे आहेत. सुट्टे कसे दयाल? कोणती व किती नाणी आणि नोटा द्याल?

- 50 रुपयाचे सुट्टे

उदाहरण: 10 + 10+ 10 + 10 + 5 + 5 = 50

50 रुपयाचे सुट्टे अजून वेगळे कसे देता येतील? किती प्रकारे देता येतील?

(४) खाली दिलेल्या रुपयांचे सुट्टे पाहिजे असतील तर किती वेगवेगळ्या प्रकारे देता येतील? वरील उदाहरणात दाखवल्या प्रमाणे लिहून सांगा?


- 100
- 59
- 71

(५) रीनाला चहासाठी लागणारे साहित्य आणण्याकरिता आईने 100 रु. दिले आहेत.
साहित्य आणि त्यांचे दर खाली दिले आहेत:

- साखर – 60 रु. प्रति किलो
- चहा पावडर – 80 रु. प्रति किलो
- दुध – 50 रु. लिटर

रीनाने प्रत्येक वस्तू पाव किलो /पाव लिटर, या प्रमाणात विकत घेतली. तुम्ही दुकानदार काकांना मदत करत आहात. रीनाने घेतलेल्या साहित्याची पावती बनवा.

खाली दिल्याप्रमाणे आपल्या वहीत पावती बनवा. रीनाला दुकानदार काकांना किती पैसे द्यावे लागतील सांगा.



## १४. चला शिकूया ठसेकाम



- मुलांना या कृतींत भेंडीचा देठ वापरायचा आहे. भेंडी नसेल तर खाली सांगितल्या प्रमाणे आगपेटीचे काड्या वापरू शकता
- पालकांनी मुलांना भेंडीचा देठ कापून, त्यामधील बिया काढून देण्यात मदत करावी.
- ठसा उमटवण्यासाठी मुलांना रंग पातळ घट्ट कसे ठेवायचे यासाठी सहकार्य लागेल.
- आवडत असेल तर मुलां सोबत पालकांनी देखील नक्षी काढावी.



**साहित्य**: भेंडीचा देठ किंवा ६ काड्या, थोडासा कापूस, रंग, कोरे पान.



(१) सर्व प्रथम चित्रामध्ये दाखवल्या प्रमाणे भेंडीच्या देठाच्या बाजूचा थोडा तुकडा कापा.

(२) तुम्ही वापरणार असाल त्या कापलेल्या भेंडीच्या भागा मध्ये बिया नकोत. तो भाग पुर्णपणे पोकळ पाहिजे. (चित्रामध्ये दाखवल्या प्रमाणे)



(३) जर भेंडी नसेल तर तुम्ही ६ काड्या घ्या आणि त्यांना दोऱ्याने किंवा रबरबँडनी एकत्र बांधा. या काड्यांच्या जुडीच्या टोकाला कापूस गुंडाळा. अशी हि काड्यांची जुडी ठसे बनवण्याकरिता वापरता येईल.



(४) तुमच्या आवडीचा रंग घ्या.

(५) भेंडीचे कापलेले देठ किंवा काड्यांची जुडी त्या रंगामध्ये बुडवा.

(६) एका कोऱ्या पानावर ते ठेऊन दाबा आणि ठसा उमटवा. आणि तुम्हाला हवी ती नक्षी काढा.

- जर रंग नसतील तर----हळद, कुंकू, होळीचे रंग, रांगोळीचे रंग या मध्ये थोडे थेंब पाणी टाकून आपण रंग तयार करू शकतो.
- तुम्हाला माहित आहे का? अजून कोणत्या गोष्टीं पासून आपण रंग तयार करू शकतो? फुलांपासून, पानांपासूनपण वेगवेगळे रंग तयार करता येतात.






## १५. चला विचार करून सोडवूयात

(१) खाली काडेपेटीच्या सहाय्याने एक कोडे (पेला) दिले आहे.

(२) तुम्हाला यामध्ये दोनच काड्या उचलून तो पेला उलटा दाखवायचा आहे. उलटा केल्यावर पेल्यामधील फुल हे पेल्याच्या बाहेर आले पाहिजे.

(३) तुम्ही कशाच्या पण काड्या (झाडाच्या काड्या, आगपेटीच्या काड्या) किंवा वर्तमान पत्राच्या पट्ट्या घेऊन करून बघा.





इथे चित्र काढुन दाखवा. काडी क्रमांक 1, 2, 3 आणि 4 कुठे ठेवाल?

(१) खाली काड्यांच्या सहाय्याने माशाचे चित्र तयार केले आहे.

(२) तो मासा उजव्या दिशेने चालला आहे.

(३) तुम्ही ३ काड्या हलवून तो मासा डावीकडे जाताना दिसेल अस करा.




इथे चित्र काढुन दाखवा. कोणती काडी कुठे सरकवाल?


## १६. काय आणि कसे करायचे?


(१) दिलेले नऊ ठिपके तुम्हाला जोडायचे आहेत.

(२) ठिपके जोडताना ते ४ सरळ रेषेतच जोडायचे आहे

(३) **सर्व ठिपके जोडून झाल्याशिवाय हात उचलायचा नाही**.

करून पहा, कसे व किती वेगवेगळे आकार तयार होतात ते सांगा !





## १७. मुलांच्या गप्पा

**चित्र निरीक्षण –** खालील चित्राचे निरीक्षण करा. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या वहीत लिहा.




(१) या चित्रात दारा पासून सगळ्यात लांब कोणत्या ५ गोष्टी आहेत? त्यांची नावे लिहा किंवा चित्रे काढा.

(२) या चित्रात कोणती वस्तू सगळ्यात महत्वाची वाटते? का? त्या ऐवजी दुसरे काही वापरता येईल का?

(३) या चित्रात अजून काही जोडायचे असेल तर ते काय असू शकते ?

(४) या चित्रातून काही खोडायचे असेल तर काय निवडाल? का?

(५) भिंतीवर दूर एक चित्र आहे, त्यात काय असेल?

(६) चित्रातील मुलांना नावे द्या. ते सगळे काय करत आहेत?

# १८. सुंदर सजावट







**तुम्ही बघितले आहे का?**

सण किंवा काही कार्यक्रम असेल तर लोक आपल्या घराच्या भिंतीवर, अंगणात, जमिनीवर, फरशीवर सजविण्याकरिता चित्र किंवा नक्षीकाम काढतात. सजविण्याकरिता काढलेली रांगोळी तुम्ही बघितली असेलच. रांगोळीला मुग्गल, कोलम, अल्पना अशीपण नावे आहेत.

(१) आपल्या वहीत रांगोळीच्या काही नक्षी काढा.

(२) त्यातील एक नक्षी फरशी वर काढा आणि सजवा.

नक्षीकाम बनवण्यासाठी आणि सजवण्यासाठी वेगवेगळ्या वस्तूंचा वापर करता येतो. जसेकि – खडे, कोरडारंग, गेरू, चुना, पीठ, फुले-पाने, पिस, डाळ, तांदूळ, धान्य, छोटे चमचे, बाटल्यांची झाकणे, माती, वगैरे.

बनवा आणि शक्य असेल तर फोटो पाठवा.

## १९. बागेतील मज्जा आणि अचानक ......



(१) या बागेचे चित्र पाहून तुम्हाला काय वाटते? तुमच्या मनात येतील असे १०-१५ शब्द लिहा.

(२) तुम्ही लिहिलेल्या शब्दांपैकी कोणतेही ५ शब्द निवडून वाक्य बनवा.

(३) तुम्ही लिहलेल्या वाक्यांचा वापर करून एक परिच्छेद लिहा.

(४) खाली दिलेली गोष्ट वाचा आणि पूर्ण करा.

**एका गावात मीनू नावाची एक मुलगी तिच्या आई बाबांसोबत राहत होती. तिला फुगे खूप आवडायचे. तिचे आई-बाबा तिला बागेत घेऊन जायचे, फुगे घेऊन द्यायचे. मिनू त्या फुग्यांसोबत तासनतास खेळायची. एका संध्याकाळी मीनूने बघितले कि शेजारची पिंकी तिच्या आई-बाबांसोबत बागेत जायला निघाली आहे. मीनूला सकाळपासूनच रंगबिरंगी फुगे आठवत होते. तिला राहवत नव्हतं. फुगे आत्ताच हवे असं वाटत होतं. मिनूने बघितले कि आई कामात व्यस्त आहे. मीनू आपली खेळणी टाकून उठली. ती हळूच घराचे दार उघडून बाहेर आली आणि बागेच्या दिशेने निघाली. बागेजवळच तिला एक फुगा सापडला. सगळं विसरून मीनू मस्त फुग्यांसोबत खेळायला लागली. तेवढ्यात अचानक................**

(५) तुम्ही ज्या बागेत गेला असाल तिचे चित्र काढा.

(६) त्या बागेतील तुम्हाला आवडलेली व न आवडलेली अशी एक- एक गोष्ट सांगा.

(७) तुम्ही कधी असे आईला न सांगता बाहेर गेला आहात का? त्यावेळी काय अनुभव आला? आपला अनुभव लिहा. मित्र-मैत्रिणींना सांगा.

## २०. चला शिकूया ठसेकाम

**साहित्य:** रंग, स्केचपेन, पेन्सिल,कोरीपाने.

**कृती:**

(१) तुमच्या आवडीचा एक रंग घ्या व त्यामध्ये काही थेंब पाणी टाका (आपल्याला रंग जास्त पातळ नको)

(२) तुमच्या हाताच्या अंगठा रंगा मध्ये बुडवा. एका कागदावर त्या अंगठयाचे ठसे उमटवा. (चित्र 'अ' मध्ये दाखवल्या प्रमाणे)


(३) आता उमटवलेले ठसे वाळू द्या.

(४) चित्र 'ब' आणि 'क' बघा. ठश्यांच्या अवतीभवती रेषा काढून पक्षी, मासे, द्राक्ष असे बरेच काही बनवता येईल.


(५) आता तुम्ही बनवलेले ठसे वापरून अशी काही चित्रे बनवा. (तुम्ही चित्र 'अ' मधील ठसे पण वापरू शकता.)

(६) तुम्ही बनवलेल्या आकारांना आता पेन्सीलने किंवा काळ्या रंगाच्या स्केचपेन ने गिरवून घ्या.


(७) अंगठ्या शिवाय तुम्ही दुसरे बोट किंवा पुर्ण हात देखील रंगात बुडवून ठसे बनवू शकता (चित्र 'ड' प्रमाणे)



**चित्र - अ**



**चित्र - ब**



**चित्र - क**



**चित्र - ड**

## २१. जलतरंग



 **वाजवा स्वतः बनवलेला बाजा**

पाण्याने भरलेले पेले बारीक काडीने किंवा चमच्याने वाजवले तर कसे आवाज येतात? तुम्ही कधी असे केले आहे का? करून बघा –संगीत तयार करा!

(१) चार किंवा सहा पेले घ्या.

(२) त्यांच्यामध्ये थोडे पाणी भरून एका ओळीत किंवा अर्धगोल आकारात लावून घ्या.

(३) या पाण्याने भरलेल्या पेल्याच्या काठावर हळूच लाकडाच्या बारीक काडीने मारा (नाद करा). आला का मधुर आवाज?

**या बाज्याचे नाव 'जलतरंग' असे का ठेवले असेल?**

**पेल्यामधे पाण्याचे प्रमाण कमी जास्त घेतले तर आवाज बदलतो का? करून बघा.**

# २२.अक्षर जोड

**मुळाक्षरांच्या क्रमानुसार प्रत्येक बिंदुला जोडा आणि कोणते चित्र तयार होते पहा.**



## २३. कोरोना सापशिडी

- हा खेळ कितीही लोकं एकत्र खेळू शकतात.
- फुलं, पानं, बटन, पिना, मणी, छोटे खडे वगैरे, गोटी म्हणून वापरू शकता
- फासा नसेल तर चिंचोके,किंवा शेंगांची टरफलेही वापरू शकता.
- खोडरबरच्या प्रत्येक बाजूवर १, २ या प्रमाणे सहा बाजूंवर अंक लिहून ते सुद्धा वापरू शकता.






**असे खेळा:**

(१) आपली गोटी तयार ठेवा.

(२) सोंगटी / फासा टाका.


(३) जेवढे अंक येतील तेवढे अंक आपली गोटी पुढे सरकवा.

(४) कोरोनाचे चित्र असलेल्या चौकोनात गोटी पोहोचली तर कोरोनाच्या चित्रावर जो अंक असेल त्या चौकोनात परत जा.

(५) गोटी जर शिडी असलेल्या चौकोनात पोहोचली तर तेथे लिहिलेला संदेश वाचा आणि शिडी चढा.

(६) तुम्हाला काही ठिकाणी चौकोनमधे तुमचेप्रश्न / मत विचारले आहे. तुमच्या वहीत त्या चौकोनाचा क्रमांक टाकून ती उत्तरे लिहा.

(७) या प्रमाणे जो लवकर शेवटच्या चौकोनात पोहचेल तो जिंकेल.



३०
शेवट
२९
२८
१७
गर्दीच्या ठिकाणी गेलात
२७
२६
३
हात मिळविला
२५
२४
कोरोना च्या कठीण परिस्थिती मध्ये तुम्ही कोणाचे आभार मानणार
२३
२२
कोरोना पासून वाचण्यासाठी तुम्ही तुमची काळजी कशी घेतात
२१
२०
सामाजिक अंतर
१९
१८
शाळा सुरु झाल्यवर तुम्ही काळजी कशी घेणार
१७
ळे राहा
१६
११
मास्क घातला नाही
१५
स्यानीटायझरचा वापर
१४
आज आपल्याला कसे वाटते हे स्वत साठी एक चित्र काढा
१३
बाहेर जाताना मास्क चा वापर
१२
करोना च्या काळात तुमच्यासाठी विशेष काय झाले
११
वेगळे राहा
१०
राला शाळा नवले आहे तर ला काय वाटते
९
८
करोना च्या काळात तुझ्यात झालेला बदल
७
६
१
रुवात
२
हात धुवा
३
४
५
चांगला आहार

माझे नाव ------------------------------------------------------------------------------------------------------------

इयत्ता ------------------------------------------------------------------------------------------------------------



| क्र . | कृतीचे नाव | काय शिकलात? | काय आवडले? | काय अडचणी आल्या? | तुमचे मत | पूर्ण झाले | दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | वर्गातील वस्तूंची गंमत | | | | | | |
| २. | माझा घोडा | | | | | | |
| ३. | चला कृती करूया | | | | | | |
| ४. | आवाज आणि अक्षर | | | | | | |
| ५. | चला जाऊ आकारांच्या दुनियेत | | | | | | |
| ६. | अक्षर अंकचित्रे | | | | | | |

| क्र . | कृतीचे नाव | काय शिकलात? | काय आवडले? | काय अडचणी आल्या? | तुमचे मत | पूर्ण झाले | दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७. | क आणि म ची कविता | | | | | | |
| ८. | अक्षर, शब्द आणि वाक्य | | | | | | |
| ९. | दोनची गंमत | | | | | | |
| १०. | शोधू शब्द, काढू चित्रे. | | | | | | |
| ११. | किती हे वेगवेगळे आकार | | | | | | |
| १२. | येतात आपल्या कामी | | | | | | |
| १३. | चला हाताळूया नाणी-नोटा | | | | | | |
| १४. | चला शिकूया ठसेकाम | | | | | | |

| क्र . | कृतीचे नाव | काय शिकलात? | काय आवडले? | काय अडचणी आल्या? | तुमचे मत | पूर्ण झाले | दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १५. | चला विचार करून जोडुया | | | | | | |
| १६. | मुलांच्या गप्पा | | | | | | |
| १७. | सुंदर सजावट | | | | | | |
| १८. | बागेतील मज्जा आणि अचानक... | | | | | | |
| १९. | चला शिकूया ठसेकाम | | | | | | |
| २०. | जलतरंग | | | | | | |
| २१. | अक्षरजोड | | | | | | |
| २२. | कोरोना साप शिडी | | | | | | |

IN COLLABORATION WITH

SF9, G Block, Adjacent to American School of Bombay,
Bandra - Kurla Complex, Bandra (E), Mumbai - 400098, Tel.: +91 22 2652 0601 / 02

www.savethechildrenindia.org